भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/१२/२०१६

१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २१/१२/२०१६ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादीच्या भाची कु. मंयुरी चद्रशेखर सेलोकर वय १६ वर्ष ४ महीने ही दुकानात जाते म्हणुन घरून निघुन गेली ती घरी परत न आल्याने तिचा नातेवाईकात, गावात शोध घेतला असता मिळुन आली नाही तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले असावे तसेच शासकीय परिपत्रका अन्वये व फिर्यादी अनिल काशिनाथ आगासे वय ३२ वर्ष रा. हसारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा धार्मीक पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

२) सोन्याचे दागीने व मोबाईल तसेच रोकरक्कमची चोरी . :–

दिनांक २२/१२/२०१६ चे २२.०० वा. त दि.२३/१२/२०१६ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी राजु शंकर हेडाऊ वय ४४ वर्ष रा. राममंदीर वार्ड यांचे घराचे समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोराने लोंखडी आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र ज्यात ७२ लहान मनी व लॉकेटसह ४ ग्रॅम, सोन्याचा गोप १५ ग्रॅम, १ सोण्याचा गोप त्यात असलेला लॉकेटसह १० ग्रॅम, ४ सोण्याच्या लहान अंगठया २ ग्रॅम, सोन्याचे झुमके ५ ग्रॅम, सोन्याची लेडीज अंगठी ३ ग्रॅम, १ सोन्याची नथ २ ग्रॅम, १ सोनाटा कंपनीची जुनी घडयाळ १ जुना मॉयक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल व नगदी १२,०००/रू असा एकुन ८३,६००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) अवैध दारु / जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २३/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर , करडी , गोबरवाही , अडयाळ , व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६६ लिटर हातभट्टी दा कि. ३३५० /–रू. व १२ लिटर ६० मिलीलीटर देशी दारू कि. ३४७५/रू. असा एकुण कि. ६८२५/–रू. चा माल जप्त करण्यात आला .

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.